लोकसत्ता

# मुंबई वृत्तान्त

मंगळवार, १७ डिसेंबर २०१३

# महिलांवरील अत्याचाराच्या 'सोच'वर तरुणाईचा हल्ला!

## दिल्ली बलात्काराला एक वर्ष पूर्ण

खास प्रतिनिधी, मुंबई

**'सोच सही, मर्द वही...'** 'लिंग निवड नका करू, मुलगा-मुलगी समान धरू'... महिलांवरील अत्याचाराचे मूळ ज्या मानसिकतेत आहे त्या 'सोच'वर हल्ला करणाऱ्या या घोषणांनी सोमवारी मुंबईतील पदपथ दणाणून गेले. या मोहिमेत केवळ तरुण मुलीच नव्हे तर त्यांच्या खांद्याला खांदा लावून तरुण मुलेही सहभागी झाली होती. निमित्त होते दिल्लीतील सामूहिक बलात्काराच्या घटनेच्या वर्षपूर्तीचे. महिलांवरील अत्याचाराच्या, त्यांच्यावर होणाऱ्या हल्ल्याच्या घटना नव्या नाहीत. पण, दिल्लीतील 'त्या' घटनेतील क्रूरतेने सर्वसामान्यांचे हृदय पिळवटून टाकण्याबरोबरच संतापाची भावनाही निर्माण केली. या घटनेने आपल्या सामाजिक जाणिवाही पुन्हा एकदा घासूनपुसून घेण्याची गरज असल्याचे दाखवून दिले.

ढिसाळ सुरक्षा व्यवस्था महिलांवरील अत्याचारांना कारण ठरत असली तरी अत्याचारांचे मूळ आहे ते समाजाच्या संकुचित आणि सनातनी वृत्तीमध्ये. या वृत्तीवर कोरडे ओढण्याची संधी या मोहिमेच्या निमित्ताने साधण्यात आली. त्यासाठी या समाजाचे भविष्य ज्यांच्या हाती आहे, अशा महाविद्यालयीन तरुण-तरुणींना सहभागी करून घेण्यात आले. चर्चगेटपासून बोरिवलीपर्यंत, सीएसटीपासून मुलुंडपर्यंत या घोषणा आणि फलक हातात घेऊन तरुण-तरुणींचे जथ्थे निघाले. पदयात्रा, पथनाट्ये यांच्या माध्यमातून महाविद्यालयीन तरुणांनी हा संदेश मुंबईकरांपर्यंत पोहोचविला.

'मेन अगेन्स्ट व्हायोलन्स अ‍ॅण्ड अ‍ॅब्युज' (मावा) या मुंबईतील स्वयंसेवी संस्थेच्या वतीने राबविण्यात आलेल्या या 'जागो रे' मोहिमेत मुंबईतील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी सहभागी झाले होते. 'औरत पर हाथ उठाना मर्दानगी नही', 'मैं इन्सान हूँ और महिलाओं के साथ इन्सान



जैसा बर्ताव करता हूँ', या पुरुषांच्या विवेकबुद्धीला हाक देणाऱ्या घोषणा देणारे तरुण मुंबईच्या रस्त्यारस्त्यावर दिसत होते.

पोदार महाविद्यालयाच्या तरुणांनी 'दे धक्का' हे पथनाट्य सादर करून समाजाच्या संकुचित वृत्तीला धक्का देण्याची गरज व्यक्त केली. तर संत गाडगे महाराज महाविद्यालय, रुईया महिला महाविद्यालय, निर्मला निकेतन, गुरू नानक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रचंड मोर्चा काढून मुंबईचे रस्ते व्यापले. अनेक महाविद्यालयांनी एकत्र येऊन छोटी नाटुकली तयार केली होती. ती या निमित्ताने जागोजागी सादर करण्यात आली.